**सेतु सुविधा केंद्रामध्ये जमा होणा-या निधीचा विनियोग करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
शासन निर्णय क्रमांक मातंसं नस्ती ०७/३७/३९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: **१०**ऑक्टोबर २०११

वाचा:- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. सिओएम १००२/प्र.क्र. २४० ०२/३९, दि. २३ ऑगस्ट २००२
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. मातंसं/नस्ती ०७/३७/३९, दि. २६ सप्टेंबर, २००८
३) शासन शुध्दिपत्रक, समक्रमांक. दि. २६.०८.२०१०
४) शासन शुध्दिपत्रक, समक्रमांक, दि. २९.१०.२०१०

**प्रस्तावना:-**

जिल्हा सेतु सोसायटीकडे उपलब्ध होणा-या निधीचा विनियोग जिल्हयातील सेतु केंद्रांच्या पायाभुत सुविधांमध्ये वाढ व त्या अनुषंगाने होणा-या बाबींवर खर्च करण्याच्या उद्देशाने संदर्भ क्रमांक २ चा शासन निर्णय व संदर्भ क्र. ३ व ४ ची शुध्दीपत्रके काढण्यात आली होती.

**शासन निर्णय:-**

जिल्हा सेतु सोसायटी जास्त कार्यक्षम करण्यासाठी तसेच सर्व पातळीवर E – Governance प्रकल्प व विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रकल्पाला चालना देण्यासाठी शासन नेहमी प्रयत्नशील आहे. त्याअनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

संदर्भ क्रमांक २ चा शासन निर्णय, तसेच ३ व ४ ची शुध्दीपत्रके अधिक्रमित करुन सेतु सुविधा केंद्रामध्ये जमा होणा-या निधीचा विनियोग हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या तारखेपासून खालील प्रमाणे करण्यात यावा.

बूट(BOOT) व्हेंडरला कराराप्रमाणे त्यांचा हिस्सा दिल्यानंतर शिल्लक राहणा-या रकमेचा विनियोग खालीलप्रमाणे करावा.

| अ. क्र. | खर्च करावयाच्या रकमेची टक्केवारी | विनियोग/ खर्चाच्याबाबी |
|---|---|---|
| १ | १० टक्के रक्कम | **राज्यस्तरीय सेतू सोसायटीकडे वर्ग करण्यात यावी.** |
| २ | १५ टक्के रक्कम | **जिल्हा सेतू सोसायटीकडे राखीव निधी म्हणून ठेवण्यात यावी.** |
| ३ | ७५ टक्के रक्कम | **अ) आवर्ती स्वरूपाचा खर्च**<br>१) संगणकासाठी पेपर स्टेशनरी.<br>२) प्रिंटर काट्रेज .<br>३) सी.डी. डिव्हीडी आणि पेन ड्राइव्ह इ.<br>४) संगणकीकरणाच्या तसेच सेतुच्या कामासाठी केलेले दौरे (TA-DA)<br>५) तालुकास्तरावरील सेतु सुविधा केंद्राच्या परीक्षणासाठी, जिल्हा सेतु केंद्राकडून झालेला TA/DA चा खर्च.<br>६) सेतू केंद्राच्या तपासणी साठी वाहन भाड्याने घेणे किवा तपासणीसाठी केलेला डिझेल.पेट्रोल वरील खर्च.<br>७) जिल्हाधिकारी यांचे मान्यतेनुसार भारतात कोठेही प्रशिक्षणात सहभाग(लोकप्रतिनिधी,शासकीय अधिकारी/कर्मचारी,महा ई-सेवा केंद्र VLE इ.)<br>८) सनदी लेखापालांच्या लेखापरीक्षण अहवालावरील खर्च.<br>९) सेतू सभेसाठी चहापान .<br>१०)पावती पुस्तकांची छपाई.<br>११)विद्युत देयक (संगणक रुमचे).<br>१२) संगणक रुमचे दूरध्वनी देयक .<br>१३) सेतु संबंधित आवर्ती खर्चाच्या इतर बाबी.<br>१४) सिटीझन सेंट्रीक सेवेसाठी आवश्यक डिजिटायजेशन, डेटा एन्ट्री व स्कॅनिंग करीता झालेला खर्च.<br>१५) सेतु सुविधा केंद्रासाठी खरेदी केलेल्या संगणक व इतर सामग्रीचा वॉरंटी कालावधी संपल्यानंतर करावयाचा देखभाल दुरुस्तीवरील खर्च .<br>16) जिल्हा/ तालुका सेतु केंद्रांमध्ये अभ्यागता साठी विविध सुविधा पुरविणे. |

**ब) अनावर्ती स्वरूपाचा खर्च**

१) सेतु संबंधित अनावर्ती खर्चाच्या इतर बाबी .

२) संगणक खरेदी

३) जर काही Mobile Applications विकसित करण्यात आले असतील तर रु. २५,००० पेक्षा कमी किंमतीचे Laptop / Tablet PC/Smart phone काही ठराविक अधिकाऱ्यांसाठी घेणे. त्याचप्रमाणे ३G / Internet Connection संबंधितांना उपलब्ध करुन देणे.

४) प्रिंटर्स / स्कॅनर / युपीएस / इनव्हटर / बारकोड रीडर / बायोमेट्रिक मशीन इत्यादी ची खरेदी.

५) लॅन कनेक्टीव्हिटी ने संगणक जोडणे.

६) जिल्हा व तालुका स्तरावरील विविध शासकीय कार्यालये/ विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाची कार्यालये (जिल्हा परिषद, पंचायत समिती ,नगरपालिका, नगर परिषद ) याचेसाठी MS WAN Horizontal Connectivity वरील खर्च

७) विविध विभागांचे कार्यालयासाठी MTNL किंवा BSNL कडुन सवलतीच्या दरात Internet Connection घेणे.

८) Digital Signature Certificate खरेदी करणे.

९) संगणकासाठी आवश्यक असलेले फर्निचर

**क) E – Governance प्रकल्प**

१) जिल्हयांच्या विविध विभागांची वेबसाईट तयार करणे व ती NSDL / NPCI पेमेंट गेटवेशी , CDAC SMS गेटवेशी जोडणे.

२) SSDG ( State Service Delivery Gateway ) सोबत जोडणे.

३) MS WAN / NIC चा Video Conferencing किंवा राज्य दर कराराप्रमाणे Video Conferencing साठी होणारा खर्च.

४) जिल्हास्तरावर संगणक प्रशिक्षण केंद्रासाठी ( Civil / Electrical / LAN / Printer / PC / Internet इत्यादी प्रकारच्या पायाभुत सुविधा तयार करणे. )

५) जिल्हा स्तरावर इतर ई-गव्हर्नस प्रकल्पाचा खर्च.

६) नागरिकांना दिल्या जात असलेल्या सेवांमध्ये Data ज्या सर्व्हरवर आहे त्यांची देखरेख करणे व डेटा एन्ट्री आणि अपडेशन करणे यावर होणारा खर्च या निधीतुन करता येईल.

७) महा ऑनलाईनमार्फत सेतू केंद्र आणि सी.एस.सी. साठी Uniform Software आणि सेवा तयार करण्यासाठी हा खर्च जिल्हा सेतू सोसायटीमार्फत करावा.

36

### ड)E- Governance धोरण

१) जिल्हयाच्या विविध ठिकाणी प्रत्येक महिन्याचा पहिला शनिवार Tech शनिवार साजरा करणे.

२) E – Governance, Citizen Services शी संबंधित चर्चासत्रे आयोजित करणे.

३) वेबसाईटचे मराठी कंटेंट तयार करणे. त्यासाठी कंत्राटी स्वरुपात कंटेंट रायटर नेमणे.

४) जिल्हास्तरावर विविध विभागांची Website ( संकेतस्थळ) तयार करण्यासाठी सुध्दा हा निधी वापरता येऊ शकेल. मात्र हे प्रकल्प आणि Website केंद्र व राज्यशासनाच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या दर करार व Website Guidelines शी सुसंगत असावेत. सदर संकेत स्थळ तयार करताना त्याचे Security Certification करुन घ्यावे. तसेच त्यामध्ये मराठी Interface व UID सोबत सांगड घालावी.

५) ई प्रशासन धोरणात नमूद केलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी सुध्दा या निधीचा उपयोग करता येईल.

**इ) स्थानिक पातळीवर संशोधनाला उत्तेजन देण्यासाठी -**

शासकीय शाळा / महाविद्यालयात वैज्ञानिक प्रदर्शने, मेळावे यांचे आयोजन, वैज्ञनिक प्रयोगशाळा उभारणे, संगणक प्रयोगशाळा उभारणे (माहिती तंत्रज्ञान, UID, ई-गव्हर्नस )धोरणासाठी चर्चासत्रे (Conference ) आयोजित करणे, देशातील नामांकित शास्त्रज्ञांचे Lectures आयोजित करणे. मुलांना इंटर नेट वापरबाबत घ्यावयाच्या दक्षता या विषयांवर चर्चा सत्र आयोजित करण्यासाठी इत्यादी .

**फ) तांत्रिक मनुष्यबळाची नेमणुक**

तांत्रिक मनुष्यबळाची म्हणजे ( Junior Programmer, Network Engineer, Software Support Staff, Tally Operators, Data Entry Operators, इत्यादी.) यांची निवड जिल्हास्तरावर दर करार निश्चित करुन पात्र झालेल्या एजन्सी मार्फत करावी. वर नमूद अ ते इ मधील प्रकल्पांच्या अमलबजावणी साठी या मनुष्यबळाचा उपयोग करता येईल. या निश्चित केलेल्या दर कराराचा अवलंब जिल्ह्यातील इतर कार्यालयांसाठी सुध्दा करता येऊ शकेल.

वर नमूद अनु क्र. १ व २ मध्ये दर्शविण्यात आलेली कार्यवाही अनिवार्य राहील. इतर बाबींवर करावयाचा खर्च खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करावयाची परवानगी जिल्हा सेतू सोसायटीना देण्यात येत आहे.

एका बाबीवरील दोन लाखांच्या वरील खर्च जिल्हा सेतु समितीच्या पूर्वपरवानगीने करण्यात यावा. आणि वीस लाखांच्या वरील खर्च राज्य सेतु समितीच्या मान्यतेने करण्यात यावा.

याशिवाय अ ते फ मधील नमूद बाबी व्यतिरिक्त काही बाबींवर खर्च करणे आवश्यक असल्यास त्याचा स्वतंत्र प्रस्ताव जिल्हा सेतू सोसायटी मार्फत राज्य सेतू सोसायटी कडे पाठवावा.

सदर शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली असून त्याचा संगणक संकेतांक 201110101436356001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(राजेश अगरवाल)
**सचिव, माहिती तंत्रज्ञान**
**महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा. मुख्यसचिव
प्रधान सचिव वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (प्रशासकीय पुनर्रचना), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय सेतु सोसायटी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद.

38